# फुलांचा धबधबा... हायड्रेंजिया.. (Hydrangea)



...... अनेक घरांत, हॉटेलमध्ये, बागेत, घराच्या कंपाउंडवर रंगीबेरंगी फुलांचे गुच्छ, पूर यावा तसे ओसंडून जातांना दिसतात.. ज्या फुलांमुळे आपले भाग्य आणि भविष्य उजळते अशी समजूत असते, ज्या फुलांच्या पोलन मुळे ॲलर्जीवाल्यांना अजिबात त्रास होत नाही अशा या फुलांचे नांव .. हायड्रेंजिया.

ह्या फुलांचे कॉमन नांव hortensia. वेगवेगळ्या हवामानात, वेगवेगळ्या ठिकाणी ही झाडे दिसतात. प्रथम ह्या झाडांची लागवड जपानमध्ये केली गेली. पण हे नांव ग्रीक आहे. Hydro म्हणजे पाणी, आणि angos म्हणजे vessel .. पात्र..

ही इतकी सुंदर फुलं आपल्याला वाटतात, पण ही फुलं नाहीत. ही आतल्या छोट्या फुलांचे रक्षण करणारी पानं आहेत.
काही ठराविक काळानंतर ही पानं रंग बदलतात. हे रंग जमिनीवर अवलंबून असतात. जमिनीचा pH लेव्हल जर 5.5 च्या खाली असला तर फुलं निळी असतात.. आणि क्षमा, कृतज्ञता, आणि समजून घेणे ह्याचे ती प्रतीक असतात.
5.5 ते 6.5 मध्ये मातीचा pH असेल तर फुलं (पर्पल) जांभळ्या रंगाची असतात.
गर्व, राजपद चे प्रतीक आहे.
6 ते 6.2 मध्ये मातीचा pH असेल तर फुलं पांढरी असतात जी शुध्दता, डौल, ह्याचे प्रतीक आहेत.
7 च्यावर मातीचा pH असेल तर फुलं गुलाबी असतात. जी प्रेम, खऱ्या भावना ह्यांचे प्रतीक असतात.

ज्यांच्या जमिनीचा pH वेगवेगळा असतो त्यांच्या एकाच झाडावर वेगवेगळ्या रंगाची फुले दिसतात. ते झाड खूपच सुंदर दिसते.



ह्या झाडाच्या ७५ जाती आढळतात. ह्या झाडांचे आयुष्य खूप असते. ५० वर्षाची पण झाडं असतात. सगळीच सुंदर, खूप फुलं येणारी झाडं विषारी कां असतात? ह्या झाडातही थोडे cynide असते. लहान मुले, पाळीव प्राणी ह्यांना त्यामुळे त्रास होऊ शकतो.

ही फुलं Alabama ची star wildflower आहेत. ही झाडे दिवसा सूर्यप्रकाशात आणि नंतर सावलीत वाढणं पसंत करतात. ही ५/६ फूट उंच वाढतात. काही १५ फूटही वाढतात. एकदा ह्या फुलांचा बहर ओसरला की त्याच्या फांद्या छाटणे आवश्यक असते. नाहीतर नंतरच्या वर्षी झाडाला जास्त फुले येत नाहीत. झाड जमिनीतून उपटल्यावरही १० दिवस जगू शकतं, किंवा सुकली तरी १/२ वर्ष राहू शकतं. पिंपळाच्या पानासारख्या फक्त शिरा रहातात. ते त्यातही आपले सौंदर्य कायम ठेवतात. ह्या फुलांना वास नसतो फक्त panicle hydrangea ला वास असतो.
ही फुलं फ्लॉवरपॉटमध्ये ५/६ दिवस चांगली राहू शकतात.
ह्या झाडाचे पोलन खूपच चिकट असतात. (स्टिकी). फुलं यायच्या आधी आमच्याकडे या झाडावर एक छोटा हिरवा हमिंगबर्ड सारखा यायचा. इतरही पक्षी, कीटक येतात. त्यांच्यामुळे चिकटून पोलन ग्रेन्स पसरतात.

काही औषधी गुण ह्या झाडांत आहेत. जाणकार त्याचा वापर करतात.



५ जानेवारी हा हायड्रेंजिया दिवस असतो.
भारतात हिमाचलप्रदेश व आजूबाजूचे थंड प्रदेश इथे ही झाडे दिसतात.
ह्या फुलांचे सौंदर्य खरोखरच अद्‌भुत आहे.

**..... चित्रा मेहेंदळे**